आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ ऑगस्ट २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारत आणि फिजी दरम्यान ९ सामंजस्य करार, दहशतवादाला थारा न देण्याच्या धोरणाचा दोन्ही देशांकडून पुनरुच्चार

- भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही लोकशाहीची ताकद असली तरी तिचा योग्य वापर करण्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं आवाहन

- युपीएसचा पर्याय स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना एनपीएसचा पर्याय स्वीकारण्याची एक संधी मिळणार

**आणि**

- राष्ट्रकुल वेटलिफ्टींग क्रीडा स्पर्धेत पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंना ३ सुवर्ण पदकं

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फिजीचे प्रधानमंत्री सितिवेनी रांबुका यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा झाली. यावेळी दोन्ही देशांमध्ये राजकीय सहकार्य, उच्चस्तरीय संबंध, व्यापार, कृषी, शिक्षण, आरोग्य, संरक्षण यासह इतरही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली, तसंच त्यांच्या उपस्थितीत एकंदर नऊ द्विपक्षीय दस्तावेज आणि सामंजस्य करार झाले. याविषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले.

- **- होल्ड - प्रधानमंत्री - - -**

चर्चेदरम्यान, दहशतवादाविरोधातलं सहकार्य वाढवण्यावर दोन्ही देशांनी भर दिला आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा, तसंच एप्रिल महिन्यात पहलगाम इथं झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. दोन्ही देशांनी दहशतवादाला अजिबात थारा न देण्याच्या धोरणाचा आज पुनरुच्चार केला. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या दक्षिण विभागाच्या सचिव नीना मल्होत्रा यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

रांबुका यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. प्रशांत महासागरातल्या बेट देशांशी असलेले संबंध बळकट करण्यासाठी भारत वचनबद्ध असून फिजी हा यापैकी एक खास भागीदार देश आहे, असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ ऑगस्ट २०२५ - सोमवार

**<><><><>**

भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही लोकशाहीची ताकद आहे, मात्र तिचा वापर योग्य प्रकारे केला पाहिजे, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्ली विधानसभेत पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेत बोलत होते. संसदेची प्रतिष्ठा खालावत आहे, ही चिंतेची बाब आहे. राजकीय पक्षांनी त्यांच्या सभागृहातल्या वर्तनाबाबत विचार केला पाहिजे, असं ते म्हणाले....

- **- होल्ड - बाईट - ओम बिर्ला - -**

सभागृहांना जनतेप्रति अधिक जबाबदार आणि पारदर्शक बनवण्याचं आवाहन बिर्ला यांनी पीठासीन अधिकाऱ्यांना केलं.

**<><><><>**

२०४७ पर्यंत भारताच्या वैज्ञानिक, तंत्रज्ञानविषयक आणि सामाजिक प्रगतीचं आयआयटी नेतृत्व करेल, असा विश्वास केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद प्रधान यांनी आज व्यक्त केला. नवी दिल्लीत ५६ व्या आयआयटी परिषद बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं, त्यावेळी ते बोलत होते. आयआयटीच्या शैक्षणिक प्रगतीचा त्यांनी यावेळी आढावा घेतला. येत्या २५ वर्षात आयआयटीचा रोडमॅप काय असेल याची चर्चा यावेळी झाली.

**<><><><>**

मुंबईच्या आयआयटी अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा ६३ वा पदवीदान समारंभ अलीकडेच झाला. दोन दिवस चाललेल्या या समारंभात २ हजार ८३८ विद्यार्थ्यांना पदवी तर ४९८ विद्यार्थांना पीएचडी प्रदान करण्यात आली.

**<><><><>**

एनपीएस अर्थात नॅशनल पेन्शन स्कीमचा त्याग करुन युपीएस अर्थात युनिफाइड पेन्शन स्कीमचा पर्याय स्वीकारणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना पुन्हा एनपीएसचा पर्याय निवडण्याची संधी केंद्र सरकारनं उपलब्ध करून दिली आहे. निवृत्तीला किमान एक वर्ष शिल्लक असताना किंवा स्वेच्छानिवृत्ती घेताना किमान ३ महिने शिल्लक असताना पुन्हा एनपीएस निवडता येईल. राजीनामा देणाऱ्या किंवा ५६ जे अंतर्गत सक्तीची निवृत्ती लादलेल्या कर्मचाऱ्यांनाही हा पर्याय निवडता येईल. सेवेतून काढून टाकलेल्या, बडतर्फ झालेल्या, शिस्तभंगाची कारवाई झालेल्या कर्मचाऱ्यांना हा पर्याय उपलब्ध होणार नाही.

एनपीएसधारकांना सरकारकडून अतिरिक्त दिली जाणारी ४ टक्के रक्कम या कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल.

**<><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि पाटणा उच्च न्यायाधीश न्यायमूर्ती विपुल पांचोली यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं राज्यातल्या ३ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर केले आहेत. त्यात नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन, लातूरचे डॉ. संदीपान जगदाळे आणि मुंबईतल्या सोनिया कपूर यांचा समावेश आहे. डॉ. शेख नांदेडमधल्या अर्धापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत तर कपूर या मुंबईतल्या अणूऊर्जा महामंडळाच्या शाळेत शिक्षिका आहेत. संदीपान जगदाळे लातूरच्या दयानंद कॉलेजातले संगीत शिक्षक आहेत. ५० हजार रुपये आणि रजत पदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<><><><>**

अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या नावे शिष्यवृत्ती सुरू करायची घोषणा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज केली. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती असेल. ॲक्झिओम ४ मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करून भारतात परतलेले शुक्ला यांचा आज लखनौ इथं आदित्यनाथ यांच्या हस्ते सत्कार झाला. येत्या काळात लोक नासाबद्दल नाही, तर इस्त्रोबद्दल बोलतील, असा विश्वास शुभांशू शुक्ला यांनी व्यक्त केला. अंतराळ क्षेत्राच्या व्यापक उपयोगितेबद्दल ते म्हणाले,

- ***- होल्ड... बाइट- शुभांशू शुक्ला- -***

- **<><><><>**

कर्मचारी निवड आयोग हा निःपक्ष आणि पारदर्शक पद्धतीनं परीक्षा घेण्यासाठी वचनबद्ध असल्याचं कर्मचारी निवड आयोगानं स्पष्ट केलं आहे. तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी तसंच गैरप्रकार रोखण्यासाठी आयोगानं अनेक पावलं उचलली आहेत. परीक्षार्थींची ओळख

निश्चित करण्यासाठी यंदा जुलै महिन्यापासून आधार प्रमाणीकरणाचा अवलंब केला जात असल्याचं आयोगाचे अध्यक्ष एस. गोपालकृष्णन म्हणाले.

<><><><>

सीएसडीएसचे सहसंचालक संजय कुमार यांच्याविरोधात महाराष्ट्र पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली.

<><><><>

अतिवृष्टीमुळे हिमाचल प्रदेशातलं जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालं आहे. त्यामुळे हिमाचलमधल्या नद्या आणि नाले दुथडी भरून वाहत आहेत.

<><><><>

उष्माघातामुळे स्पेनमधे १ हजार १४९ जणांचा आतापर्यंत मृत्यू झाल्याचं सरकारच्या आकडेवारीत म्हटलं आहे. ऑगस्ट महिन्यात स्पेनमधे तीव्र स्वरूपाची आणि आतापर्यंतची सगळ्यात मोठी उष्णतेची लाट आल्याचं तिथल्या हवामान संस्थेनं म्हटलं आहे.

<><><><>

आशियाई नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मिटर पिस्टल सांघिक प्रकारात भारताच्या नेमबाज मनु बाकर, इशा आणि सिमरनप्रीत ब्रार यांनी कांस्यपदक पटकावलं. चीनला सुवर्ण तर दक्षिण कोरियाच्या संघाला रौप्य पदक मिळालं.

<><><><>

तिसाव्या राष्ट्रकूल भारोत्तालन क्रीडा स्पर्धेत आज पहिल्याच दिवशी भारतानं तीन सुवर्णपदकांची कमाई केली. गुजरातमधे अहमदाबादमध्ये ही स्पर्धा सुरू आहे. महिलांच्या स्नॅच आणि क्लिन अँड जर्क प्रकारात ४४ ते ४८ किलो वजनी गटात प्रितीस्मिता भोईनं एकूण दीडशे किलोग्रॅम वजन उचलत पदक पटकावलं, तर मीराबाई चानूनं ४९ किलो वजनी गटात १९३ किलो वजन उचलून नवा विक्रम करत सुवर्णपदक पटकावलं.

पुरुषांच्या भारोत्तोलन प्रकारात ५६ ते ६० किलो वजनी गटात धर्मज्योती देवघरियानं एकूण २२४ किलोग्रॅम वजन उचलत पदक मिळवलं.

//<><><><>//